● गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## राष्ट्रीय पंचायत पुरस्कारात महाराष्ट्र द्वितीय स्थानी

### सर्वोत्तम ग्रामपंचायत आणि ग्राम ऊर्जा स्वराज्य विशेष पंचायत या श्रेणींमध्ये मान्याचीवाडी ग्रामपंचायत अव्वल

**नवी दिल्ली -** महाराष्ट्राने राष्ट्रीय पंचायत पुरस्कार-२०२४ मध्ये सहा राष्ट्रीय पुरस्कार मिळवत दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. ओडिशा आणि त्रिपुरा राज्याने प्रत्येकी सात पुरस्कारांसह संयुक्तपणे पहिला क्रमांक पटकावला आहे. आंध्र प्रदेश चार पुरस्कारांसह तिसऱ्या स्थानावर तर बिहार आणि हिमाचल प्रदेश राज्यांनी प्रत्येकी तीन श्रेणींमध्ये पुरस्कार मिळवले.

दारिद्र्य निर्मूलन, आरोग्य, बालकल्याण, जलसंधारण, स्वच्छता, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय, प्रशासन आणि महिला सक्षमीकरण या निकषांवर पंचायतींच्या प्रयत्नांना ओळखण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायती राज विभागाच्यावतीने राष्ट्रीय पंचायत पुरस्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

विज्ञान भवनात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात, संयुक्त राष्ट्राने ठरविलेल्या विविध श्रेणीतील ४५ पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज करण्यात आले. या कार्यक्रमासाठी केंद्रीय पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, राज्यमंत्री प्रो. एस.पी बघेल, सचिव विवेक भारद्वाज यांसह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध श्रेणींमध्ये राष्ट्रीय पंचायत पुरस्कार प्रदान केला. यावेळी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करताना, श्रीमती मुर्मू यांनी या पुरस्कारांद्वारे प्रदान करण्यात



आलेल्या मान्यतेचा उद्देश इतर पंचायतींना सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करण्यास व ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्यासाठी प्रेरित करेल, अशी आशाही व्यक्त केली.

पंचायती राज राष्ट्रीय पुरस्कार विविध श्रेणींमध्ये प्रदान करण्यात आले यामध्ये दिनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत एकूण २७ पुरस्कार प्रदान करण्यात आले. या श्रेणीत नाशिक जिल्ह्यातील मोडाळे ग्रामपंचायतीला स्वच्छ व हरित पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार ग्राम पंचायतीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला.

सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी या ग्रामपंचायतीला आज दोन श्रेणीत प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पहिली श्रेणी - नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत एकूण नऊ पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात सर्वोत्तम ग्रामपंचायतचा प्रथम पुरस्कार सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी ग्रामपंचायतीला प्रदान करण्यात आला तर याच ग्रामपंचायतीला ग्राम उर्जा स्वराज्य विशेष पुरस्कार श्रेणीत अव्वल स्थान प्राप्त झाला व प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. या श्रेणीत नऊ पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार **पान २ वर**

## गोवंश हत्त्या रोखून कारवाई करा

### बजरंग दलची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील गोवंश हत्या रोखून प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अशी मागणी आज दिनांक १० मंगळवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माध्यमांशी बोलताना बजरंग दल प्रांत गौरक्षक प्रमुख राहुल वर्तले यांनी केलीय. जालन्यात सर्रास गोवंश हत्या होत असून या कडे प्रशासनाने लक्ष द्यावे असं राहुल वर्पले म्हणालेत. काही २ दिवसांपूर्वी जनावरांच्या कातडीचे गोमांस जप्त करण्यात आले होते. मात्र या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही असा आरोप राहुल वर्तले यांनी केलाय. दरम्यान प्रशासनाने गोवंश हत्या रोखून योग्य त्या कारवाया कराव्यात नसता बजरंग दल आपल्या पद्धतीने कारवाई करेल असा इशारा देखील बजरंग दल प्रांत **पान २ वर**



**जालना विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार अर्जुनराव खोतकर यांचा मुंबई येथे सत्कार करताना पं.स. माजी सभापती पांडुरंग डोंगरे, मौजपुरी माजी सरपंच सिद्धार्थ मोरे, युवा सेना कार्यकर्ते विष्णु डोंगरे आदी.**

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २० डिसेंबर २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू **पान २ वर**

## नदी पात्रातील अतिक्रमणे हटवा

### सामाजिक संघटना आक्रमक; हुतात्मा जनार्दन मामा चौकात निदर्शने

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील कुंडलिका आणि सीना नदीपात्रातील अतिक्रमणे ताबडतोब हटवण्यात यावीत या मागणीसाठी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक संघटनांच्या वतीने हुतात्मा जनार्दन मामा चौकात निदर्शन आंदोलन करण्यात आले. शहरातील गोल्डन ज्युबली शाळेशेजारील थाडेश्वर महादेव मंदीराच्या कंपाऊंड भिंतीला जोडून सीना नदीपात्रात एक किलोमीटर लांबलचक आणि बारा मिटर रुंद बेकायदेशीर रस्ता रातोरात तयार करण्यात आला आहे.मुरूम दगड घालून नदीपात्रात या रस्त्यामुळे सीना नदी पात्र एकदम लहान झाले आहे . जालना शहर महानगरपालिकेचे प्रशासक संतोष खांडेकर यांच्यासह महानगरपालिकेतील संबधित अधिकाऱ्यांनी या अतिक्रमणाची पाहणी केली आहे मात्र राजकीय दबावामुळे हे अतिक्रमण महानगरपालिकेतील संबधित अधिकारी काढत नाहीत याच सोबत या भागातील प्लॉटींगच्या धंद्यातील भूमाफीया या अतिक्रमणाच्या मागे आहेत. कुंडलिका व सीना रिज्युनिवेशन फाऊंडेशन चे सचिव उदय शिंदे, **पान २ वर**

## युवा आदर्श

### संरक्षण सामग्री ...

बदलत्या तंत्र युगात
कळीचा मुद्दासंरक्षण
भल्यामोठ्या निधीचे
आवश्यक रे आरक्षण
ए आयतंत्रज्ञान आले
बदले सारे समिकरण
मानव रहीत शस्त्रास्त्रे
मांडा नवीन व्याकरण
आत्मनिर्भर मंत्र जाण
जरुरीचे स्वदेशीकरण
आंतरराष्ट्रीय रे मानक
त्यानुरूप सबलीकरण
मंजूर व्हावे बडे बजेट
विरोध नको अकारण
रोजगार उपलब्ध होई
कारखाने निजी करण
अवलंबन दुसऱ्या देशा
धोका वृध्दी निष्कारण
चलन वाचेल मोठाले
वेळेत प्राप्ती उपकरण
कालापासून रे पुरातन
आखले स्वदेशी धोरण
जवान मनोबल राखता
हो बलशाली भारतरण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## दत्तक वस्ती योजनांच्या कंत्राटांची चौकशी होणार!

**घाटकोपर । प्रतिनिधी -** मुंबई महानगर पालिकेने परिसरातील नालेसफाई आणि स्वच्छता गृहाच्या देखभालीसाठी दत्तक वस्ती योजना जाहीर केली. झोपडपट्टीत साफसफाई,घराघरांतून कचऱ्याचे संकलन,छोटी गटारे,सार्वजनिक शौचालये आदींची स्वच्छता करण्याकरिता पालिकेतर्फे ही योजना राबविली जाते.प्रत्येक महापालिकेच्या विभागामध्ये लॉटरी पद्धतीच्या माध्यमातून दत्तक वस्ती योजनेसाठी संस्थांची निवड केली जाते,आणि मग त्या संस्थेला वस्तीच्या स्वच्छतेची जबाबदारी सोपविली जाते.यासाठी प्रत्येक सफाई कामगाराला पालिका वेतन अदा करते.त्यामध्ये संस्थांनी वस्तीच्या स्वच्छतेची सर्व कामे करून घ्यावी,असे या योजनेत अपेक्षित आहे.मात्र मुंबई महानगर पालिकेच्या एन विभागात घाटकोपर पश्चिम मधील दत्तक वस्ती योजनेत मोठा गैरकारभार चालू असून दत्तक वस्ती योजनेचे कंत्राटदार यांच्या माध्यमातून कामगार केवळ कागदावर दाखवून त्यांच्या वेतनाची रक्कम ठेकेदार खिशात टाकत असल्याचे प्रकार घडत आहेत,यात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे सर्व प्रकारे चालू आहेत.तसेच दत्तक वस्ती योजना अस्तित्वात असून ही सर्वच वॉर्डात नाले सफाई,कचरा संकलन होत नसल्याच्या तक्रारी आहेत.असा सर्व धक्कादायक प्रकार महानगर पालिकेच्या एन विभागाच्या घाटकोपर पश्चिम **पान २ वर**

## लॉयन्स क्लबचे झोन चेअरपर्सन राजेश लुनिया यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**जालना । प्रतिनिधी -** उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल लॉयन्स क्लबचे झोन चेअरपर्सन राजेश लुनिया यांचा लायन्स क्लब ऑफ जालना रायल्स व राजेश कामड मित्र मंडळाच्यावतीने जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला.

शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. लॉयन्सचे प्रांतपाल गिरीश सिसोदिया, भाईश्री रमेशभाई पटेल, प. पू. मनोज महाराज गौड, राजेश कामड, रामकुवर अग्रवाल आदी मान्यवरांच्याहस्ते राजेश लुनिया आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सपना लुनिया यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान



करण्यात आला. याप्रसंगी माजी आमदार कैलास कैलास गोरंट्याल, भास्करराव आंबेकर, संजय खोतकर, विनयकुमार कोठारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. राजेश लुनिया यांनी जालना लॉयन्स क्लबचे अध्यक्ष, सचिव, लिओ क्लबचे अध्यक्ष, श्री महावीर स्थानकवासी जैन श्रावक संघ संचलित गुरु गणेश दृष्टीहिन विद्यालयाचे कार्याध्यक्ष, एम. एस. जैन इंग्लिश स्कूलचे कार्याध्यक्ष आदी पदे त्यांनी भूषविलेली आहेत. लॉयन्स क्लबच्या माध्यमातून पारसमल चंपालाल लुनिया यांच्या स्मृत्यर्थ **पान २ वर**

## भारतीय संविधानाच्या प्रतीची विटंबना करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** परभणी येथे दि.१० डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाच्या प्रतीची तोडफोड जातीवादी समाजकंटकांने केली होती, बघता बघता हि बातमी वाऱ्यासारखी संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली, परभणी येथे आंबेडकरी समाज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर जमा झाला होता, या घटनेचा निषेध म्हणून बल्लारशा वरून मुंबईला जाणाऱ्या नंदिग्राम एक्सप्रेसला जमावाने काल थांबवले होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला होता त्याचाच एक



भाग म्हणून आज दि.११ डिसेंबर रोजी परतूर येथील आंबेडकरी समाज्याच्या वतीने परतूर चे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाच्या प्रतीची विटंबना करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी परतूर शहारासह तालुक्यातील आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे, या निवेदनावर रामप्रसाद थोरात, अर्जुन पाडेवार, रोहन वाघमारे,रामचंद्र पानवले, अशोक ठोके, प्रदीप साळवे, राजाभाऊ भदर्गे,दीपक वक्ते, राहुल कांबळे, उत्तम सोनपसारे, रंगनाथ पहाडे, शिवप्रसाद प्रधान, **पान २ वर**

## वाळु उपसा करणाऱ्या बोटसह वाहने ताब्यात

### हनुमंत खेडा परिसरात तहसिल कार्यालयाची कारवाई



**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील तहसील कार्यालय व जाफराबाद पोलीस स्टेशनच्या अवैध वाळू वाहतूक तथा अवैध उपसा करणाऱ्यांच्या विरोधात मोहीम उघडलेली आहे. यासाठी संपूर्ण तालुक्यात विशेष पथके निर्माण करण्यात आली आहे. अशाच एक पथक तहसीलदार डॉक्टर सारिका भगत व जाफराबाद पोलीस स्टेशनचे पीआय इंगळे यांच्या नेतृत्वात पूर्णा नदीच्या पात्राचे सर्वेक्षण करताना त्यांना एक बोट वाळू उपसा करताना आढळून आली. लगेच त्यांच्या पथकाने त्या बोटीसह **पान २ वर**

संपादकीय पान

# उपमुख्यमंत्री पद संविधानिक नसतांना सुध्दा या पदाची निवड का? हा राज्यांवर लादलेला बोजा नाही का?

## दक्षिणेतील देव

दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७४ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात तीन वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने दोन वर्षापूर्वी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व. रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी-कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते. रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात. दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत.



ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

कोणतेही संविधानिक आधार नसतांना देशातील १६ राज्यात २६ उपमुख्यमंत्री पद दिसून येते;ही राजकीय मनमानी नाही का? असा प्रश्न आज सर्वसामान्यांना पुढे उपस्थित होतो. भारतीय संघराज्यात सध्या तरी २८ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेश आहेत येथे निवडणूक होऊन आलेली सरकारे आहेत. घटनेच्या कलम १६४ मध्ये राज्य सरकारच्या स्थापनेचा उल्लेख आहे.परंतु उपमुख्यमंत्री पद राजकीय समझोत्यासाठी संपूर्ण पक्षांनी तयार केलेले पद असल्याचे दिसून येते.कारण मुख्यमंत्री व संबंधित विभागाचे मंत्री असतांना राज्यांना उपमुख्यमंत्र्यांची गरज का असावी? असाही प्रश्न उद्भवतो.परंतु राजकारण टीकावे,रुसवे-फुगवे दुर करण्यासाठी सर्वपक्षाणुमते उपमुख्यमंत्री पद तयार केल्याचे दिसून येते व याचा बोजा देशांवर व राज्यावर मोठ्या प्रमाणात पडत आहे;हे कोणत्याही सरकारला कसे का दिसत नाही?आपण उपमुख्यमंत्री पदावर आमदारांना विराजमान करून राज्यातील जनतेवर जास्तीचा भार लादत आहोत असे राजकीय पुढाऱ्यांना का वाटत नाही?राज्यघटनेत उपमुख्यमंत्री पदांचा उल्लेखच नाही.परंतु या पदाला कॅबिनेटचा दर्जा देवून संविधानिक रीत्या या पदाचा वापर करण्यात येतो हे कायद्याचे उल्लंघन असुन संविधान विरोधी आहे.देशातील १६ राज्यानी २६ उपमुख्यमंत्री निर्माण करून १६ राज्यांच्या जनतेवर जास्तीचे ओझे लादल्याचे दिसून येते.उपमुख्यमंत्री कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतात,त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीवर राज्यपाल त्यांना उपमुख्यमंत्री पदाचा दर्जा देतात.म्हणजेच उपमुख्यमंत्री पद हे राजकीय सोयीसाठी तडजोडीचे साधन असल्याचे समजते. संविधानिक लोक जर अशा चुकीच्या पध्दतीचा वापरत करीत असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे?राज्यघटनेत कोणत्याही प्रकारचा उल्लेख नसलेले व संविधानिक आधार नसलेले उपमुख्यमंत्री पद समजल्या जाते.परंतु राजकीय पुढारी आपल्या स्वार्थासाठी व राजकारण टिकून रहावे याच उद्देशाने उपमुख्यमंत्री पद निर्माण केल्याचे दिसून येते.यामुळे उपमुख्यमंत्र्याला कॅबिनेटचा दर्जा प्राप्त होते.यावरून स्पष्ट होते की ज्याची सत्ता त्याची मनमानी असे हे उपमुख्यमंत्री पद असल्याचे मी समजतो. ७ जुन २०१९ ला आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी आपल्या सरकारमध्ये पाच उपमुख्यमंत्री ठेवण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला होता. देशात पहिल्यांदाच एखाद्या राज्याच्या मंत्रिमंडळात पाच उपमुख्यमंत्री झाले होते.जगमोहन रेड्डी यांनी पाच उपमुख्यमंत्री अशा पध्दतीने ठरविले होते अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय जाती, अल्पसंख्याक आणि कापू समाजातील असतील.अशी घोषणा जगनमोहन रेड्डी यांनी विधिमंडळाच्या बैठकीत त्यावेळी केली होती.यापूर्वी चंद्राबाबू नायडू यांच्या कार्यकाळात दोन उपमुख्यमंत्री होते. यामधील एक मागासवर्गीय जाती आणि दुसरे कापू समाजातील होता. देशाचा पंतप्रधान किंवा राज्याच्या मुख्यमंत्री ही वैधानिक पदे आहेत.उपपंतप्रधान वा उपमुख्यमंत्री ही वैधानिक पदे नाहीत मात्र राजकीय सोय करण्यासाठी सत्ताधारी अशी पदे निर्माण करतात आणि राज्यांवर व देशावर जास्तीचे ओझे लादल्या जाते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.एकंदरीत उपमुख्यमंत्री ही वैधानिक पदे नसल्याने याची निवड असायलाच नकोत, परंतु राजकीय सोय म्हणून, निव्वळ सन्मान म्हणून,मुख्यमंत्री एक किंवा अनेक उपमुख्यमंत्री नेमू शकतो.उपमुख्यमंत्री पद नेमने ही सत्ताधाऱ्यांची मनमानीच म्हणायला हरकत नाही.मी केंद्र सरकारला, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष यांना विनंती करतो की देशातील संपूर्ण राज्यातील;संविधानिक आधार नसलेले पदे बरखास्त केली पाहिजे व फक्त संविधानिक पदांमार्फतच राज्याचा कारभार चालवला पाहिजे.यामुळे राज्यासह देशाचा कारभार सुरळीत चालेल व देशाच्या १४० कोटी जनतेपर्यंत एक चांगला संदेश जाईल. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## न्यायाधीशांविरोधात महाभियोग?

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शेखर कुमार यादव यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती, जी आता यादव यांना भोवतील असं दिसत आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या भाषणाची दखल घेतली असून या प्रकरणी उच्च न्यायालयाकडून माहिती मागवण्यात आली आहे. दरम्यान, नॅशनल कॉन्फरन्सचे खासदार आगा सय्यद रहुल्ला मेहदी यांनी मंगळवारी (११ डिसेंबर) शेखर कुमार यादव यांच्या हकालपट्टीसाठी संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची प्रक्रिया सुरू केली. एआयएमआयएमचे प्रमुख व खासदार असदुद्दीन ओवैसी, समाजवादी पार्टीचे खासदार झिया-उर-रहमान व मोहिबुल्लाह, मार्क्स व लेनिनवादी कम्युनिस्ट पार्टीचे खासदार सुदामा प्रसाद, राजस्थानमधील भारत आदिवासी पार्टीचे प्रमुख राजकुमार राओत, यांच्यासह इतर सहा खासदारांनी या महाभियोग प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे. लोकसभेत प्रस्ताव मांडण्यासाठी किमान १०० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असणं आवश्यक आहे. तर राज्यसभेतील ५० खासदारांनी यावर स्वाक्षरी करायला हवी.

राज्यघटनेचे उल्लंघन केल्याबद्दल राष्ट्रपतींना ज्या प्रक्रियेद्वारे पदावरून हटवले जाते, त्याला ‘महाभियोग प्रक्रिया’ असे म्हणतात. उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना पदावरून हटवण्यासाठी देखील हीच प्रक्रिया राबवली जाते. सभागृहात मांडलेल्या या प्रस्तावावर एक-चतुर्थांश सदस्यांनी सह्या करणे आणि हा प्रस्ताव मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींना १४ दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक असते.

जर महाभियोगाचा प्रस्ताव पहिल्या सभागृहाने दोन-तृतीयांश बहुमताने पारित केला, तर तो प्रस्ताव दुसऱ्या सभागृहाकडे पाठवला जातो. दुसऱ्या सभागृहातील सदस्य या आरोपाची चौकशी करतात. यावेळी राष्ट्रपतींनाही आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार असतो. त्यानंतही जर दुसऱ्या सभागृहातील दोन-तृतियांश सदस्यांनी हा प्रस्ताव पारित केला, तर तो प्रस्ताव पारित करण्याच्या तारखेपासून राष्ट्रपतींना पदावरून बाजूला केले जाते. एकंदरीतच महाभियोग प्रक्रिया ही अर्धन्यायिक प्रक्रिया आहे. भारतात आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रपतींवर महाभियोग चालवण्यात आलेला नाही.

२०१८ मध्ये काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी भारताचे तत्कालीन सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्यावर कथित गैरवर्तन व अधिकारांचा गैरवापर केल्याप्रकरणी महाभियोगाची नोटीस पाठवण्यात आली होती. ६४ खासदारांच्या स्वाक्षऱ्यांचं पत्र तत्कालीन राज्यसभेचे अध्यक्ष व्यंकय्या नायडू यांच्यासमोर सादर करण्यात आलं होतं. मात्र, नायडू यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला होता. सरन्यायाधीशांवरील आरोप योग्य नसल्याचं उपराष्ट्रपतीनी म्हटलं होतं.

ग्वाल्हेरच्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यालयातील महिला न्यायमूर्तींनी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. के. गंगेले यांच्यावर कथित लैंगिक छळाचे आरोप केले होते. त्यानंतर राज्यसभेच्या ५८ खासदारांच्या स्वाक्षरीचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यानंतर राज्यसभेने हे आरोप तपासण्यासाठी न्यायाधीशांची एक चौकशी समिती स्थापन केली होती. मात्र, या समितीने न्यायमूर्ती गंगेले यांची निर्दोष मुक्तता केली.

पान १ वरुन

### राष्ट्रीय पंचायत ...

ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला.
नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीतील सर्वोत्तम ब्लॉक पंचायत या श्रेणीत गोंदिया जिल्ह्यातील तिरोरा या पंचायत समितीला तृतीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार तिरोरा पंचायत समितीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला. कार्बन न्यूट्रल विशेष पुरस्काराच्या श्रेणीत भंडारा जिल्ह्यातील बेळा ग्राम पंचायतीला प्रथम पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला. तर, पंचायत क्षमतानिर्माण सर्वोत्तम संस्थान या श्रेणीत पुण्याच्या यशदा अकादमीला तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार अकादमीचे उप महासंचालक व संचालक मल्लिनाथ कलशेट्टी व वरिष्ठ अधिकारी यांनी स्वीकारला.
यावेळी केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह यांनी विजेत्या पंचायतांना डिजिटल स्वरूपात पुरस्काराची रक्कम हस्तांतरित केली. मोडाळे ग्रामपंचातीला ५० लाख, मान्याचीवाडीला २.५ कोटी (रूपये १.५ कोटी व रूपये १.०० कोटी ग्राम ऊर्जा श्रेणीत), तिरोरा पंचायत समितीला १.५ कोटी, बेळा ग्रामपंचायतीला रूपये १ कोटी आणि यशदा अकादमीला ५० लाख रुपये प्रदान करण्यात आले.
या कार्यक्रमात पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह यांनी ‘पुरस्कार प्राप्त पंचायतांचे कार्य: सर्वोत्तम प्रथा’ या पुस्तिकेचे अनावरण केले. या पुस्तिकेची पहिली प्रत राष्ट्रपतींना सादर करण्यात आली. याशिवाय, काही पंचायतांच्या उत्कृष्ट कार्यावर आधारित एक माहितीपट देखील सादर करण्यात आला.
राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४ मध्ये विविध श्रेणींमध्ये पंचायतींना सन्मानित करण्यात आले, त्यात दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार, नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार, ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कार, कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत पुरस्कार आणि पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्थान पुरस्कार श्रेणींचा समावेश होता.

### गोवंश हत्त्या ...

गो रक्षक प्रमुख राहुल वर्तले यांनी दिलाय. यावेळी बजरंग दलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते
यावेळी देवगिरी प्रांत गौरक्षा प्रमुख राहुलजी वर्तले, विशाल वाघमारे, रोहित जाधव, ऋषी करपे, अर्जुन घारे, व्यंकटेश भगत, शेषराव गुंजकर, सुरेश सैबेवर, दत्त पवारसह आदींची उपस्थिती होती.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी ...

राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### नदी पात्रातील ...

रोटरी क्लब ऑफ जालना चे सचिव रवी भक्कड, प्रवीण पवार, प्रतिभा श्रीपत, संजय देशपांडे, उमेश दाड यांच्यासह अनेक नागरिक या निदर्शनात सहभागी झाले.

### दत्तक वस्ती ...

येथील सर्वच वॉर्डात सुरू आहे,तर एन विभागातील सर्वच वॉर्डातील स्वच्छतेची कामे होत नसल्याने ही योजना केवळ कागदावरच आहे.संस्थांच्या गैरप्रकारांमुळे या विभागातील कचरा रोजच्या रोज उचलला जात नाही.तसेच या योजनेच्या नियमाप्रमाणे घरोघरी जाऊन कुठल्याच ठिकाणी कचरा संकलन होत नाही आणि विभागातील गटारांची ही सफाई होत नाही.त्यामुळे या योजनेचीचं आता स्वच्छता करावी अशी तेथील सर्व स्थानिक नागरिकांची मागणी आहे.तरी मुंबई महापालिकेच्या एन विभागातील घाटकोपर पश्चिम येथील दत्तक वस्ती योजनेच्या सर्वच कंत्राटांनची योग्य प्रकारे चौकशी व्हावी अशी मागणी स्थानिकांसह सामाजिक कार्यकर्ते यांनी मुंबई महानगपालिका मुख्य आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली होती.या तक्रारीची आयुक्तांनी गंभीर दखल घेतली असून तत्काळ एन विभागातील घाटकोपर पश्चिम मधील सर्वच दत्तक वस्ती योजनांच्या कंत्राटांची चौकशी करण्याचे आदेश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

### लॉयन्स क्लबचे ...

सर्वधर्मीयांसाठी मोफत स्वर्ग सेवा हा उपक्रम ते राबवित आहेत. जैन समाजात कुणाचा मृत्यू झाल्यास अंत्यसंस्काराचे सामान, तिरडी बांधण्यापर्यंतची सेवा ते देतात. त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
सत्काराला उत्तर देताना राजेश लुनिया म्हणाले की, हा सन्मान मला अतिशय भावनिक आणि अभिमानास्पद वाटतो. माझ्या कार्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दल आणि सामाजिक कार्याची दखल घेतल्याबद्दल आभारी आहे. या प्रवासात मला साथ दिलेल्या प्रत्येक व्यक्तीचा मी मनापासून ऋणी आहे. लॉयन्स क्लब ही सेवाभावी संस्था जी समाजसेवेच्या क्षेत्रात कार्य करत आहे, तिचा भाग होणे हा माझ्यासाठी नेहमीच गौरवाचा विषय राहिला आहे. हा सन्मान मला अधिक मेहनतीने आणि निःस्वार्थ भावनेने कार्य करण्यासाठी प्रेरित करेल, असे ते म्हणाले.

### भारतीय संविधानाच्या ...

ॲड. सुभाष पडीभार, भगवान बनकर, कैलास पहाडे, प्रशांत वाकळे,अशोक पाईकराव, योगी प्रधान, अशोक पहाडे, स्वप्निल पहाडे, राहुल पहाडे,निवृत्ती पाईकराव, दीपक हिवाळे, समाधान मोरे, हनुमंत वक्ते जयपाल भालके, संदीप मस्के यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### वाळु उपसा ...

तेथील वाहन सुद्धा ताब्यात घेतले. सविस्तर वृत्त असे की या बोटीच्या माध्यमातून खडकपूर्णा धरणाच्या बॅकवेटर परिसरातील पूर्णा नदीच्या पात्रात असलेल्या पाण्यातून या बोटीच्या माध्यमातून अवैध वाळू उपसा करण्यात येत होता. आणि त्यानंतर ही वाळू उपसा करून अवैधरित्या वाहतूक करून विकल्या जायची. याची माहिती या पथकाला मिळाल्यानंतर त्यांनी ही धडाकेबाज कारवाई केली. त्यांनी हे सर्व वाहने आणि ती बोट जप्त करण्यात आली. या पथकामध्ये त्यांना सहाय्य करण्यासाठी मंडळ अधिकारी इंगोले साहेब, टेंभुर्णी चे तलाठी राम धणेश साहेब, तलाठी दत्ता वाघ, भगवान इंगळे, पोलीस कर्मचारी शिंदे साहेब, व सहाय्यक इतर कर्मचारी यांच्या पथकाने ही कारवाई केलेली आहे.
जाफराबाद तालुक्यांमध्ये अशा मोहिमा उघडलेले आहेत अशाच मोहिमा जिल्हाधिकारी कार्यालयांनी त्यांच्या स्तरावर निर्माण करून, अवैध कामाविरोधात मोहिमा उघडाव्यात अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.

## पोलिसांशी साटेलोटे करून गुन्हा लपवण्यासाठी चित्रे हटवली; समितीची कारवाईची मागणी !

**फोंडा । प्रतिनिधी -** ‘दिल्ली आर्ट गॅलरी’मध्ये ‘हुसेन : द टाइमलेस मॉडर्निस्ट’ या नावाने भरवण्यात आलेल्या चित्रप्रदर्शनामध्ये हिंदुद्वेषी चित्रकार एम.एफ. हुसेन यांनी रेखाटलेली हिंदु देवी देवतांची नग्न आणि आक्षेपार्ह चित्रे लावण्यात आली होती. ती आक्षेपार्ह चित्रे तात्काळ हटवण्यात यावी, तसेच दिल्ली आर्ट गॅलरीच्या संचालकांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली होती. या संदर्भात समितीच्या वतीने अधिवक्ता अमिता सचदेवा यांनी ‘संसद मार्ग पोलीस ठाण्या’त ९ डिसेंबरला तक्रार केली होती. त्यानंतर सदर आक्षेपार्ह चित्रे आयोजकांकडून रातोरात हटवण्यात आली आणि ‘तशी चित्रे नव्हतीच’ असा दिखावा करण्यात आला. आमच्या तक्रारीनंतर देवतांची चित्रे हटवली गेली, हे साध्य झाले असले, तरी जोवर आयोजकांवर कारवाई होत नाही, तोवर आम्ही हा लढा चालूच ठेवू, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ते श्री. नरेंद्र सुर्वे यांनी मांडली. धर्मयोद्धा अधिवक्ते, हिंदु जनजागृती समिती आणि हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी संघटितपणे दिलेल्या लढ्याला आलेले यश आहे, असेही श्री. सुर्वे या वेळी म्हणाले.

जरी ‘तेथे अशी चित्रेच नव्हती’,



असा कांगावा आयोजकांनी पोलिसांसमोर केला असला; तरी त्या चित्रांचे फोटो आणि अन्य पुरावे आमच्याकडे आहेत. आयोजकांनी जाणीवपूर्वक स्वत:चा गुन्हा लपवण्यासाठी ती चित्रे रातोरात हटवून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भातील दुसरी तक्रारही हिंदु जनजागृती समितीने संसद मार्ग पोलीस ठाण्यात करत प्रदर्शनस्थळी असलेल्या सीसीटीव्हीचे फुटेज ताब्यात घेण्याची मागणीही समितीने केली आहे.

या चित्रप्रदर्शनातील एका चित्रांमध्ये भगवान श्री गणेशाच्या मांडीवर एका नग्न स्त्री (अर्थात् रिद्धी/सिद्धी या देवींपैकी एक) बसलेले दर्शवले आहे. दुसर्या एका चित्रात भगवान हनुमान एक नग्न स्त्रिला (अर्थातच सीतामातेला) एका हातात घेऊन उडत असल्याचे दाखवले आहे. तर अन्य एका चित्रात शिर नसलेले भगवान शिव आणि त्यांच्या मांडीवर एक नग्न स्त्री असे अत्यंत आक्षेपार्ह चित्र रेखाटले आहे. ही चित्रे हिंदूंच्या धार्मिक भावना हेतूतः दुखावणारी असून आयोजकांवर भारतीय दंड संहितेच्या कलम २९५ (अ) आणि भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९ नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी समितीने केली आहे. हेच जर अन्य धर्मीयांच्या श्रद्धास्थानांच्या बाबतीत घडले असते, तर दिल्लीतही ‘सर तन से जुदा’चे नारे लावत दंगली झाल्या असत्या, असेही श्री. सुर्वे या वेळी म्हणाले.

यापूर्वीही हिंदुद्वेषी चित्रकार एम्.एफ. हुसेन यांनी रेखाटलेल्या भारतमाता आणि हिंदु देवता यांची नग्न आणि अश्लील चित्रे रेखाटून कोट्यवधी हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या होत्या. त्यांच्याविरोधात देशभरात १२५० अधिक पोलीस तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यानंतर हुसेन यांनी देश सोडून पळ काढला आणि वर्ष २०११ मध्ये त्यांचे निधन झाले. दिल्ली ऑट गॅलरीतील लढ्यामध्ये सर्वोच्च न्यायालयातील जेष्ठ अधिवक्ता मकरंद अडकर, अधिवक्ता शांतनू, अधिवक्ता केसरी, अधिवक्ता विक्रम, अधिवक्ता यादवेंद्र, सनातन स्वाभिमान सभा अध्यक्ष ब्रिजेश शर्मा आणि समितीचे प्रवक्ते श्री. नरेंद्र सुर्वे सहभागी झाले होते.

# मानव विकास आयुक्तालयाचे उपायुक्त मिलिंद नारिंगे यांच्या बदनापूर तालुक्यातील विविध कामांना भेटी

**जालना । प्रतिनिधी -** मानव विकास आयुक्तालयाचे उपायुक्त मिलिंद नारिंगे यांनी मानव विकास कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणाऱ्य योजनांच्या अनुषंगाने जालना जिह्यातील बदनापूर तालुक्यातील कामांच्या ठिकाणी भेट दिली.

ग्रामीण भागातील सर्वच मुलींना इ. १२ वी पर्यंत शिक्षण घ्यावे शक्य व्हावे या करिता गाव ते शाळा या दरम्यान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत पुरविण्यात आलेल्या सोमठाणा-बदनापूर-वरुडी-गेवराई दरम्यानच्या बसची पाहणी करण्यात आली. सदर बसमधून प्रवास करणा-या विद्यार्थीनीशी नारिंगे यांनी संवाद साधून विद्यार्थीनींना मार्गदशन केले.कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, बदनापूर या शाळेच्या भेटी दरम्यान सर्व विद्यार्थिनी शालेय गणवेशात उपस्थित असल्याने नारिंगे यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थीनींना देण्यात येणाऱ्या सोई सुविधांची त्यांनी पाहणी केली. विद्यार्थीनी व शिक्षिका यांच्याशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. विद्यालयात विद्यार्थीनी करिता ज्या सुविधांची कमतरता आहे, त्याबाबतचा प्रस्ताव मानव विकास अंतर्गत सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्हा परिषद प्रशाला, शेलगांव येथे भेटी दरम्यान मानव विकास कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थीनींना देण्यात आलेल्या सायकलींची पाहणी केली, यावेळी बहुतांश विद्यार्थीनी शाळेला येण्यासाठी सायकलचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले. ज्या विद्यार्थीनीच्या सायकली नादुरुस्त झालेल्या आहेत, त्या सायकलींची दुरुस्ती करुन वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. देवपिंपळगाव येथील जिल्हा परिषद शाळेमधील विज्ञान प्रयोग शाळेस भेट दिली असता या शाळेतील विद्यार्थ्यांचे विज्ञान विषयक ज्ञान व आवडीचे उप आयुक्त



नारिंगे यांनी कौतुक केले व विद्यार्थ्यांना विज्ञान व गणित या विषयांच्या अनुषंगाने स्पर्धा परिक्षा व होमी भाभा सारख्या परिक्षांना बसण्यासाठी शिक्षकांनी प्रवृत्त करावे अशा सूचना दिल्या. निर्मिती योजने अंतर्गत देव पिंपळगाव येथील कृषी गटास देण्यात आलेल्या जंबो ग्रिडींग मशीनची पाहणी केली व गटातील सदस्यांशी चर्चा व मार्गदर्शन केले. सदर योजने अंतर्गत देण्यात आलेल्या मशीनचा जमा खर्च अद्यावत ठेवण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या.

सदर भेटीच्या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी तथा मानव विकास सुचित कुलकर्णी, शिक्षणाधिकारी, श्रीमती मंगल धुपे, गट शिक्षणाधिकारी क्षीरसागर, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे आगार व्यवस्थापक जैवळ, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी जानकर, घायतिडक, मानव विकास आयुक्तालयातील शिंदे,जाधव व कृषी विभागचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# रामनगर साखर कारखाना सुरु करणे हीच खरी श्रद्धांजली - गोरंट्याल

## सहकार महर्षी बाळासाहेब पवार पुण्यतिथीनिमित्त दंतरोग शिबीर



**जालना । प्रतिनिधी -** सहकार महर्षि बाळासाहेब पवार यांचा २६ व्या पुण्यतिथी निमित्त जालना शहरातील काद्राबाद येथील जैस्वाल हेल्थ केअर येथे आयोजित करण्यात आलेले मोफत दंत रोग शिबिरास चांगला प्रतिसाद मिळला.

या कार्यक्रमाचे उदघाटन माजी आमदार कैलाश गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पत्रकार जेष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख जालना मर्चेट बँकचे माजी अध्यक्ष अंकुश राउत, अ‍ॅडव्होकेट विनायक चिटनिस, पत्रकार अशोक मिश्रा, चंद्रकांत कुलकर्णी आर्दीची प्रमुमख उपस्थिती होती. या उपक्रमासाठी डॉ जैस्वाल यांना उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बोलतांना माजी आमदार कैलाश गोरंट्याल यांनी रामनगर साखर कारखाना सुरु करुन शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देणे हीच बाळासाहेब पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल, यासाठी सर्वानी मिळून संगठीत प्रयत्न करण्याची गरज असल्याचे माजी आमदार कैलाश गोरंट्याल यानी आपली भावना व्यक्त करतांना संगीतले. या प्रसंगी सुंदरराव कुंदळे, यशवंत शिशोदे, सचिन जैस्वाल यांच्यासह दंत रुग्णांची उपस्थिती होती.

## नवभारत व जेबीके विद्यालयात वाहन चालकांची बैठक

# सुरक्षतेबाबत केल्या सूचना



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबिके विद्यालयात मुलांना निदान करणाऱ्या वाहनांच्या वाहन चालकांची सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर होते. विशेष प्रतिनिधी म्हणून डॉक्टर आनंदराव जाधव, वासुदेवराव क्षीरसागर यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये वाहन धारकांना सूचना करण्यात आल्या. सर्व विद्यार्थ्यांची सुसंवाद साधावा, प्रत्येक पांचालकाजवळ आयडेंटिटी कार्ड असावे, सर्व वाहने डाव्या साईडने चालावी, वाहनामध्ये मर्यादिपेक्षा जास्त विद्यार्थी येऊ नये, पांचालकाने आपला क्रमांक प्रत्येक विद्यार्थ्याला जवळ द्यावा, वाहन चालकाने प्रत्येक पालकाकडे त्यांचा नंबर द्यावा, प्रत्येक वाहनचालकाने कार्यालय प्रमुखाशी संपर्क करावा, अनचालकाला ड्रेस असावा, सर्व विद्यार्थ्यांना सांभाळून न्याय सांभाळून आणावे ही जबाबदारी घेऊन, सुरक्षित वाहन चालवावे यासारख्या सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांची वाहनात काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. यात सर्व वाहनचालकांनी सकारात्मक भूमिका दर्शविली. वाहन चालक उपस्थित होते. विनोद इंगळे शिवप्रसाद शिंदे, मिलिंद मस्के सचिन अंधारे, जाकीर सिद्दिकी. तसेच विद्यार्थ्यांच्या बाबतीत काय माहिती हवी असल्यास संपर्क करावा.

# दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेचे १२ डिसेंबरला आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्य जिल्हा समाज कल्याण विभागाच्यावतीने दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा श्री.गुरु गणेश दृष्टीहिन विद्यालयाच्या मैदानावर सकाळी ८.३० ते दुपारी ४ या वेळेत होणार आहेत. स्पर्धेनिमित्ताने जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांचे सकाळी ८ वाजता श्री.गुरु गणेश दृष्टीहिन विद्यालयाच्या मैदानावर संचालन होणार असून स्पर्धेचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना व इतर मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. दुपारी ४ वाजता क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वितरण करुन स्पर्धेचा समारोप करण्यात येणार आहे. असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## शंभर शिक्षक क्लब जालनाच्या राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कारांची घोषणा

# राज्यातून २८ शिक्षकांना आदर्श सेवा गौरव पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** येथील १०० शिक्षक क्लब तर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा गौरव पुरस्कारार्थी शिक्षकांची निवड करण्यासाठी निवड समितीची बैठक दि. ७ डिसेंबर रोजी स्वयंमतेज अर्क्डमी,जालना येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस १००शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर,पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष आर. आर. भाऊ जोशी , सदस्य श्री.पी. जी. बोराडे ,प्रा. चाटे,अशोक माधवले,विजय निकाळजे, संदीप इंगोले, श्रीमती माया कवानकर, डॉ. शिवनंदा मेहेत्रे, श्रीमती सुनीता गवई व कविता दाभाडे यांची उपस्थिती होती. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात बैठक संपन्न झाली.सर्वच विषयावर सविस्तर व सखोल चर्चा करण्यात आली व समिती समोर आलेली नावे, त्यांचे शैक्षणिक कार्य व विद्यार्थी गुणवत्तेसाठीचे काम याबाबींचा विचार करून महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी राज्यातील २८ पुरस्कारार्थी शिक्षकांची (यात ७ + ७ = १४ जिप व ७ + ७ = १४ संस्थेचे शिक्षक शिक्षिका) व ६ आदर्श शाळांची निवड सर्व संमतीने करण्यात आली.पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव सन्मानचिन्ह, फ्रेम केलेले प्रमाणपत्र व मानाचा फेटा देऊन केला जाणार असल्याची माहिती आर. आर. जोशी व राजेभाऊ मगर यांनी पत्रका व्दारे दिली आहे. यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख, ठिकाण व प्रमुख अतिथी इत्यादी बाबींवर चर्चा झाली. अतिथींकडून होकार आल्यावर कार्यक्रम पत्रिका अंतिम केली जाईल.पण पुरस्कार वितरण सोहळा जालना येथेच रविवार दि. २९/१२/२०२४ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता घेण्यात येईल यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.



पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे १) श्रीमती रिया मयुरी आळवेकर, उपशिक्षक, शाळा जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा ओरोस बुद्रुक नं .१ ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग २) श्रीमती सविता सदाशिव आढाव,सहशिक्षिका - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जांभुळपाडा ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक ३) श्रीमती रोहिणी गंगाधर दांडगे, सहशिक्षिका - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,बाराबंगला केंद्र - कसारा ता.शहापूर जि.ठाणे ४) श्रीमती अरुणा नामदेव पवार,सहशिक्षिका - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,अंचाडे ता. जि. धुळे ५) श्रीमती रोहिणी चंद्रकांत पिंपरखेडकर, सहशिक्षिका - जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा,कुंभेफळ, ता.जि. छत्रपती संभाजीनगर ६) वर्षादेवी बाजीराव कन्नाके, सहशिक्षिका ,जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळा, मेंढा (किरमिटी) ता. नागभिड जि. चंद्रपुर ७) श्रीमती सफिया अहेमद अब्दुल पटेल,सहशिक्षिका -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तुपेवाडी ता. बदनापूर जि. जालना ८) श्री. सुरजलाल लिंगाराम येलमुले, प्राथमिक शिक्षक - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,छल्लेवाडा ता.अहेरी जि.गडचिरोली ९) श्री. राजेश बाबाराव इघारे, पदवीधर शिक्षक,जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मंगरली, केंद्र - लेंडेझरी ता. तुमसर जि. भंडारा १०) श्री. राजेंद्र ज्ञानदेव कडव, सहशिक्षक जिल्हा परिषद केंद्र शाळा, गंगापुर ता. भुदरगड जि. कोल्हापूर ११) श्री.राजन गौतम गरुड,प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा , बोरीचापाडा जि. पालघर १२) श्री. देवेंद्र कुमार जगन्नाथ बोरसे, सहशिक्षक , जिल्हा परिषद शाळा,सिंदीपाडा - १ , ता.अक्कलकुवा जि. नंदुरबार १३) श्री. पद्माकर बाबुराव गोंडगे, सहशिक्षक, जिल्हा परिषद प्रशाला, देऊळगाव गात ता. सेलू जि. परभणी १४) श्री.सुधीर विष्णू मोटे ,सहशिक्षक- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गाढवेवस्ती मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर १५) श्री. गोविंद नगोराव शिंदे ,मुख्याध्यापक - जेएसपीएम लातूर द्वारा संचलित,स्वामी विवेकानंद विद्यालय,कळंब रोड, लातूर जि. लातूर १६) डॉ. संदीप तात्यासाहेब माने,सहशिक्षक - मुलुंड विद्यामंदिर न्ड ज्युनिअर कॉलेज, मुलुंड जि. मुंबई १७) श्री.सुनील भाऊराव वानखडे, सहाय्यक शिक्षक - अनुसूचित जाती मुलींची शासकिय निवासी शाळा,शेळद ता. बाळापूर जि.अकोला १८) श्री. शरद नंदराम औरंगे सहशिक्षक - श्री. शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित - इंदिरा गांधी हायस्कूल, नांदेड जि. नांदेड १९) श्री. संजय पुंडलिक खंडार, सहाय्यक शिक्षक - श्री. सत्यसाई विद्यामंदिर,अंबिका नगर, नागपूर जि. नागपूर २०) श्री. दिलीप काशिनाथ पाटील, उपशिक्षक - साने गुरूजी नूतन माध्य. विद्यालय, अमळनेर जि. जळगांव २१) श्री. मिलिंद नारायणराव पंडागळे, सहशिक्षक - कै. नानासाहेब पाटील प्राथमिक विद्यालय, चंदनझिरा, जि. जालना २२) श्रीमती स्वाती जितेंद्र देसाई , उपशिक्षक - कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, भुईंज जि. सातारा २३) श्रीमती शोभा केशव जाधव, मुख्याध्यापिका - लोकनेते राजारामबापू पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कवठेमहांकाळ जि. सांगली २४) श्रीमती अनघा जितेंद्र सासवडकर, सहशिक्षिका - सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राहुरी, जि. अहिल्यानगर २५) श्रीमती वंदना रमेश ठाकरे , सहशिक्षिका - सेंट्रल पब्लिक स्कूल, मेहकर जि. बुलढाणा २६) श्रीमती दिपाली एकनाथराव बारगजे, सहशिक्षिका - शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंत प्राथमिक विद्यालय, बीड जि. बीड २७) श्रीमती. पोले शारदा आनंदराव, सहशिक्षिका नरहर कुरुंदकर प्राथमिक विद्यालय, कुरुंदा.जि. हिंगोली व २८) श्रीमती मंदाकिनी खलसे, सहशिक्षिका - संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालय, शाकुंतलनगर,जालना जि. जालना. विशेष सन्मान- डॉ. शिवनंदा मेहेत्रे,जिप प्रशाला मुलांची,जालना, श्रीमती दिपाली अहिरे - शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय, नाशिक व श्रीमती दिपाली सतीश सावंत-जिप प्राथमिक शाळा,शेकापूर (बाई) जि. वर्धा यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल समुहा तर्फे विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे - प्रा. डॉ. आनंद जाधव

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबीके विद्यालय, येथे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्फूर्ती निर्माण करण्यासाठी प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव यांचे मोटिवेशन स्पीच ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणित शिक्षिका शेख मॅडम होत्या. उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख होते. डॉ. आनंद जाधव यांनी विद्यार्थ्यांना मध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विविध उदाहरणे देऊन आपले मोटिवेशन स्पीच केले. विद्यार्थ्यांना निरीक्षण क्षमता कशी विकसित केली. विद्यार्थ्यांमध्ये संवाद साधण्याची कला विकसित होईल. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची वृत्ती कशी पुढे जाईल. हे उदाहरणे आणि बोधकथेने त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा जेणेकरून कोणत्याही गोष्टी कोणत्याही अडचणी सहजतेने सोडवता येतील यासाठी त्यांनी विहीर उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये हसत खेळत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. विविध उदाहरणे समजून सांगताना विद्यार्थ्यांना हसवत खेळवत ठेवले. नमस्कार आपण विद्यार्थ्यांनी शिक्षकांशी संवाद साधताना नम्रता आणि संस्कार स्वीकारले पाहिजेत हे सुद्धा विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितले. अध्यक्ष स्थानावरून शेख मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जवळील ज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे शिक्षकांशी संवाद साधला पाहिजे अडीअडचणी विद्यार्थ्यांनी शिक्षकांना सांगितल्या पाहिजे जेणेकरून समस्याच निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. प्रमुख पाहुणे म्हणून दत्ताराजेराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांशी सुसंवाद कसा साधावा हे सुद्धा समजावून सांगितले. याप्रसंगी प्रा कैलास जाधव, प्रा अरुण आहेर, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक गजानन धोटे, वासुदेव क्षीरसागर, भिलावेकर, पाटील, कळंबे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वी सेवेसाठी प्रयत्न केले. वासुदेव क्षीरसागर यांनी केले. आभार प्रा. सुनील बनसोडे यांनी मानले.



# प्रसंगी चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जे बी के विद्यालय येथे प्रासंगिक चित्रकला संपन्न झाली. यात्रसंगीत चित्रकला स्पर्धेमध्ये तीन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली, ६९ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत ची पक्षी वितरण नुकतेच संपन्न झाले. बक्षीस वितरणाच्या अध्यक्षपदी नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वासुदेव क्षीरसागर, कैलास जाधव, डॉक्टर आनंद जाधव, भिलावेकर मॅडम, शेख मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक गजानन धोटे, हे होते.

प्राथमिक गट पाचवी ते सातवी मध्ये तीन बक्षिसे देण्यात आली यात प्रथम बक्षीस १०१ रुपया, द्वितीय बक्षीस ५१ रुपये, तृतीय बक्षीस २१ रुपये, बक्षीसांचे मानकरी होत्या निकिता कल्याणकर, अनुष्का कामे आराध्या वाघ, आठवी गटामध्ये, दोन बक्षिसे देण्यात आली प्रथम बक्षीस १०१ रुपये द्वितीय बक्षीस ५१ रुपये,श्रावणी घोडके, कार्तिकी गायके, आर्दीनी बक्षीस मिळवली.नवी सांगितले की विद्यार्थ्यांमध्ये कलेची आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व कळावं, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत उतरता कसं येईल हे समजण्यासाठी, प्रासंगिक



दहावी गटामध्ये प्रथम बक्षीस एकशे एक रुपया, द्वितीय बक्षीस ५१ रुपये, तृतीय बक्षीस एकवीस रुपये, बक्षीसांच्या मानकरी होत्या,आरती गोरे, आरती सोनाजी गोरे, भारती गोरे आदींनी पक्षाचा वितरण करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्व बक्षीस विजेत्यांना पक्ष्यांचे वितरण करण्यात आलं. याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलताना, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी यांनी स्पर्धेचा आयोजन करण्यात आलं होतं, याप्रसंगी स्पर्धेसाठी विषय देण्यात आलेले होते त्या विषयातून विद्यार्थ्यांच्या आवडीचे विषय दिल्याने यामध्ये ७० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता प्रासंगिक असूनही मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी भाग घेतल्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केलं. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर आनंद जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन प्राध्यापक अरुण आहेर यांनी केले.

## घनसावंगी येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** नागरिकांना विविध शासकीय योजना व विधी सेवांबाबतची माहिती व लाभ देण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन आणि जालना विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा. एम. मोहिते यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, कायदे विषयक विविध कल्याणकारी योजना, गुन्ह्यातील पिडीत व्यक्तींसाठी नुकसान भरपाईच्या योजना आणि मोफत कायदे विषयक सल्ला देण्यासाठी जालना जिल्हा प्रशासन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांच्या संयुक्त विद्यम ाने रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी आयटीआय, घनसावंगी, जि. जालना येथे सकाळी १०:३० वा. विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा आणि योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा जालना जिल्हा पालक न्यायमुर्ती संदीपकुमार सी. मोरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रम ुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम. मोहिते, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, जालना जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲ बाबासाहेब इंगळे, जालना जिल्हा वकील संघाचे ॲ विकास टी. पिसुरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या महामेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व्हावी. तसेच कायदेविषयक जनजागृती व्हावी, याकरिता न्यायालय, महसुल, पंचायत, कृषी, नगर प्रशासन, पोलीस, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ, महिला अर्थिक विकास महामंडळ, महिला बाल विकास विभाग, समाज कल्याण जिल्हा परिषद, पंतप्रधान स्वनीधी योजना, आरोग्य विभाग, सामाजिक संस्था आदी अशा प्रकारचे विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स या महामेळाव्यात उभारण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत-जास्त नागरिकांनी या महामेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि प्रम ुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा. एम. मोहिते, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर प्रणिता भारसाकडे-वाघ, उपजिल्हाधिकारी (सा.) तथा अंबड उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे, घनसावंगी तालूका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश क स्तर सी.एस जगताप, घनसावंगी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. दिपक शिवतारे यांनी केले आहे.

# पौर्णिमा बौद्ध महिला महासंघाच्यावतीने रोहित जाधव यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** येथील माता रमाबाई आंबेडकर नगरातील रोहित सुबोधकुमार जाधव यांनी थायलंड मध्ये जावून बौद्ध धम्म आणि विप्पस्सनेचे शिक्षण घेतले आहे. यानिमित्त पौर्णिमा बौद्ध महिला महासंघाच्यावतीने एका समारंभात रोहित जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

थायलंड येथील चेंगमायी शहरातील वटपा सोमदेत प्रायाना वाचीरो डोम या विहारात जालना येथील ज्येष्ठ पत्रकार सुबोधकुमार साळूबाजी जाधव यांचे चिरंजीव रोहित सुबोधकुमार जाधव यांनी २ एप्रिल २०२४ पासून ते ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत लुंफो विरीयन सिरीनधरो यांच्याद्वारे मार्गदर्शित बुद्धानुसती विप्पसना साधना पुज्य भंते थेरो पाईरोच यांच्याकडून ग्रहण केली. त्याद्वारे उपासक रोहित सुबोधकुमार जाधव यांनी बेसिक मेडीटेशन टीचर डिप्लोमा प्राप्त केला. या कालावधीत त्यांनी उपसंपादित भिक्षू होवून ध्यान साधनेची पदविका प्राप्त केली.तसेच थायलंड येथील सुवर्णभूमी येथे राहून वर्षावास केला. (बौद्ध धर्मात वर्षावासाला खूप महत्व असून,त्यांनी स्वतः ३ महिने वर्षावासात राहून कठीण चिवरदान ग्रहण केले.) पिंडपात करने, वंदना घेणे, समाधी साधना, वर्षावास, कठीण चिवरदान आणि २२७ विनयाचे पालन करून तथागत गौतम बुद्धांनी शिकविलेल्या बौद्ध धम्माचा बेसिक अभ्यास ग्रहण केला. विशेष म्हणजे उपासक रोहित सुबोधकुमार जाधव हे थायलंड येथील भिक्खू संघाच्या सानिध्यात आणि मार्गदर्शनाखाली विश्व शांतीसाठी ५ मे २०२३ ते १९ जुलै २०२३ दरम्यान नागपूर ते लेह लडाख ही ८०० किलोम ीटर पर्यंत निघालेल्या पदयात्रेत सहभागी झाले होते. तेंव्हा देखील रोहित सुबोधकुमार जाधव हे उपसंपादित भिक्षू होते.

दरम्यान थायलंड येथील बौद्ध धम्म आणि विप्पस्सनेचे शिक्षण प्राप्त केल्यानंतर रोहित जाधव हे भारतात परत आले आहेत.त्यानिमित्त रेल्वे स्टेशन परिसरातील आनंदनगर येथील पौर्णिमा बौद्ध महिला महासंघाच्यावतीने एका समारंभात सत्कार करण्यात आला.



यावेळी महासंघाच्या अध्यक्षा रंजना सिरसाट,सचिव विशाखा तवले यांच्यासह कांताबाई सदावर्ते, सुम नताई शिंदे, सरुबाई मगरे, वच्छलाबाई सोनवणे, सुनीता धिवार, कलिंदा दासुद, मिना इंगळे, शिलाबाई पारधे, वर्षा जाधव, मंदा साळवे,उघडे ताई,उषा दासुद आणि माता रम ाबाई आंबेडकर नगर, जयनगर येथील शंकुतलाबा जाधव, शशिकला जाधव, विशाखा मोरे, सखुबाई जगताप, लक्ष्मी सरकटे, मंगल बनकर, विम लबाई उजगरे, कल्पना वाघम ारे,ज्योती मोरे, ललिता घेवंदे, सुनिता सोनवणे, मंगला वाघम ारे, सुवर्णा कांबळे,वैशाली हिवाळे,शोभा सोनवणे, चांगुणा पैठणे, ज्योती घेवंदे, मिनाबाई साबळे,रंजनाबाई बोर्ड, बाळुताई वाहुळे, मायाताई भारद्वाज,उज्वला जाधव,ज्योती जाधव, कल्पना घेवंदे, ज्योती घेवंदे, वैशाली बनसोडे, दिक्षा वाघमारे,सविता उजगरे, मिना पट्टेकर, छाया कोकणे, राजश्री उघडे, रत्नमाला साळवे, पुनम साळवे, सिंधुबाई खरात, दिपाली म्हस्के, रुपाली काकडे,आशाबाई आदींची उपस्थिती होती, तसेच काँग्रेसचे एस.स्सी.एस. टी. सेलचे जालना जिल्हाध्यक्ष दिनकर घेवंदे, सुनिल डोळसे, यशवंत साळवे, दादाराव साळवे, पत्रकार भिमराव इंगळे, महेश बोर्ड हिंगोली येथील ॲड. रावण धाबे, ॲड. नागेश अंभोरे, ॲड.अभिजीत खंदारे यांनी देखील रोहित जाधव यांचा सत्कार केला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.